# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १६६-२२ दिनांक - ०८/०६/२०२२

## दुचाकी चोरट्यास काशिमीरा पोलीसांनी अटक करुन ३ ॲक्टीवा स्कुटर केल्या जप्त.

दिनांक ०३/०६/२०२२ रोजी फिर्यादी श्री. रमेशचंद्र रामनरेश मौर्या रा. अमिशा गार्डन, सेंट झेविअर स्कुलच्या समोर, काशिगाव, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे यांनी त्यांची ॲक्टीवा मोटार सायकल क्र. MH 04 GW 6390 व त्यांचे /जवळ राहणारे किशोर सिताराम मोर्या यांची ॲक्टीवा मोटार सायकल क्र. MH 04 GL 6858 ही चोरीस गेल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ३६८/२०२२ भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोटारसायकलचा तपास करित असतांना काशिमिरा पोलीस ठाण्याच्या पोलीसांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे राजु नथुलाल शर्मा, वय -४५ वर्षे रा. माशाचा पाडा, दर्गा रोड, मराठी शाळेजवळ काशिगाव, काशिमीरा मिरारोड पुर्व जि. ठाणे यास अटक करण्यात आली. नमुद आरोपीताकडे तपासादरम्यान कसोशीने तपास करुन त्याचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेल्या १) ॲक्टीवा मोटार सायकल क्र. MH04 GW 6390, २) MH 04 GL 6858 अश्या ॲक्टीवा वाहनांसह, ३) MH 04 HR 6382 (खोटी नंबर प्लेट) पांढऱ्या रंगाची ॲक्टीवा अशा एकुण ३ ॲक्टीवा मोटार सायकल हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

गुन्हयाचे तपासामध्ये अधिक माहिती घेतेली असता नमुद आरोपीतावर १) कस्तुरबा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर I १३६/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०, २) पंतनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर I १४६/२०१२ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०, ३४, ३) पंतनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर I १४२/२०१२ भादवि कलम ३८०, ३४ प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे माहिती मिळून आली आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त, मुख्यालय अति.कार्य. पो.उप आ. परीमंडळ-१, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, पोनि/गुन्हे श्री विजय पवार, पोनि/प्रशासन श्री जितेंद्र पाटील, पो.उप.निरी. सुरज जगताप, पोहवा/०३००७ विजय गंभिरराव, पोशि. सतीश निकम, पोशि. हनुमंत तेरवे, पोशि. समीर यादव सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केली आहे.